JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मानवी हक्कांबाबत भारतीय विचारवंतांचे विचार आणि कार्य

**(Thoughts and work of Indian thinkers regarding human rights)**

**प्रा.डॉ.ताराचंद माधव सावसाकडे**
राज्यशास्त्र विभाग,प्रमुख
धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर,
जि.जळगाव -४२५५०३

**सारांशः-**

पाश्चात्य राष्ट्रांमध्ये मानवी हक्काच्या संदर्भात विचारमंथन यांची सुरुवात अनेक विचारवंतांनी केली. ग्रीक नगर राज्यांच्या काळात स्ट्राइक तत्त्ववेत्त्यांनी नैसर्गिक हक्काच्या या संकल्पनेवर भर दिला. थॉमस हॉब्ज, जॉन लॉक आणि रूसो यांनी विचारवंतांनी सामाजिक करार सिध्द्धांतामधुन मानवी हक्कांचा पुरस्कार केला. रोमन कायदा पद्धतीमध्ये मार्कस तुलुस सिसेरो यांनी मानवी हक्कांसाठी महत्वपुर्ण योगदान दिले. १७ व्या शतकात ह्युगो ग्रोसियसने प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गीक हक्कांच्या आधुनिक आधुनिक कल्पनेचे ओळख करून दिली. मॉन्टेस्क्यु या विचारवंताने नैसर्गीक कायद्याच्या तत्वासह आणि काही अंशी नैसर्गीक हक्कांच्या अविकसित तत्वासह स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनास पाठींबा दिला. अशाप्रकारे पाश्च्यात्य विचारवंतांनी विचार मांडून मानवी हक्कांसाठी योगदान दिले. तसेच भारतीय विचारवंतांनी सुध्दा मानवी हक्कांसाठी सामाजाकि, राजकीय, सुधारणांच्या सहाय्याने कार्य करून योगदान दिले. व्यक्तीस जिविताचा, मुक्तसंचार करण्याचा, शिक्षणाचा, व्यक्तीस्वातंत्र्याचा, संपत्तीचा हक्क असावा. त्यासोबतच नैतिक हक्कांचा नागरी,सामाजिक, आर्थिक हक्कांचा पुरस्कार राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, न्या.महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, महत्मा फुले, डॉ.बाबासहेब आंबेडकर यांनी केला.

**मुळ शब्दः-** मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय

**प्रस्तावनाः-**

ब्रिटिश राज्यकर्ते जेव्हा भारतात आले तेव्हा पाश्चिमात्य प्रबोधनाचे लोन त्यांनी आपल्याबरोबर आणले. इंग्रजी राजवटीसहित आलेल्या नव्या विचारांमधून भारतीयांना बरेच काही शिकण्यासारखे होते. मानवी जीवनात केवळ ऐहीकच संदर्भ आहे, मरणोत्तर सदगतीसाठी झटण्यापेक्षा जिवंत असेपर्यंतच्या सुखासाठी माणसाने झटावे, प्रस्थापित भ्रम-अज्ञानापासून व सामाजिक विषमते पासून मानवाची मुक्ती करण्याचे प्रयत्न करावेत- असे अनेक धडे पाश्चात्य प्रबोधनाने भारतीयांना दिले. साधारणता १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात प्रबोधनाला सुरुवात झाली. या प्रबोधनाची सुरूवात राजा राममोहन रॉय यांनी प्रथमता केली. त्यामुळे ब्रिटीश राजवटीकडे उदामतवादाने पाहणारा एक विचारप्रवाह सुरवातीला भारतात उदयास आला. त्यामध्ये दादाभाई नौरोजी, न्या.गोविंद रानडे, महर्षी दयानंद सरस्वती, ना.गोपाळ गोखले, लोकमान्य टीळक, महात्मा फुले यांच्या सारख्या अनेक नवशिक्षित तरूनवर्ग समोर आला. यांच्यावरती पाश्चात्य विचारांचा प्रभाव पडला तरी देशहीताच्या दृष्टीकोणातून या विचारवंतांनी मांडणी केली.

ब्रिटीश राजवटीचे दुरगामी परीणाम भारतीय समाजव्यवस्थेवर झाले. कायद्याचे राज्य,मानवी हक्क, स्वातंत्र्य यांचे महत्व नवतरूणांना पटले. जे. एस. मिल, एडमंड बर्क, हर्बट स्पेन्सर यांच्या प्रभावामुळे स्वातंत्र्याचा स्वशासनाचा आग्रह या तरूनवर्गाने धरला. पाश्चात्य उदारमतवादाच्या तत्वज्ञानामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व नैतिक मुल्य याची माहीती भारतीय विचारवंताना पटली. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सुरू असलेल्या सुधारणा चळवळीने अखेर राजकीय क्षेत्रात प्रवेश केला व भारतीय स्वातंत्र्य चळवळीला सुरूवात केली. भारतात राजकीय चळवळ कोणत्याही स्वरूपात अस्तित्वात नव्हती. जनतेत नागरी आणि राजकीय हक्काबाबत जाणीव नव्हती. या राजकीय हक्कांची जाणीव निर्मितीचे कार्य प्रथम राजाराम मोहन रॉय यांनी केले.

**संशोधानाची उद्दीष्टेः-**

१) मानवी हक्कांची संकल्पना समजुन घेणे

२) भारतीय विचारवंतांचे मानवी हक्का बाबतचे कार्य जाणून घेणे.

३) भारतीय विचारवंतांचे मानवी हक्का बाबतचे विचारांचा शोध घेणे.

**गृहीतकेः-**

१) मानवी हक्क हे व्यापक व सर्वसमावेशक आहेत.

२) स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारतीय विचारवंतांनी कार्य केले.

३) व्यक्तीच्या सर्वांनी विकासाठी मानवी हक्कांची गरज आहे.

**संशोधन पध्दतीः-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ,पुस्तके मासिके,साप्ताहीके,वर्तमानपत्रातील लेख, व संकेतस्थळावरील माहीतीचा आधार घेण्यात आला आहे. सोबतच ऐतिहासीक, तुलनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**मानवी हक्क**

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजाचा घटक या नात्यानेच आपले जीवन जगत असतो. मानवी जीवनाच्या अनेक विविध गरजा व्यक्तीला समाजात राहूनच पूर्ण करता येतात.व्यक्तीच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. म्हणजे मानवाची एक जैविक प्राण्यापासून सामाजिक प्राण्यात रूपांतर होण्याचे कार्य त्याच्या समाजातील वास्तव्यामुळेच होते असते. व्यक्तीला आपल्या प्राथमिक किंवा जीवनावश्यक गरजांची पूर्तता करता यावी म्हणून त्यास निसर्गानेच काही सामर्थ्य प्रदान केलेले असते.परंतु सामाजिक जीवन जगताना मनुष्य आपल्या नैसर्गिक सामर्थ्याचा वापर स्वतःच्या मनाप्रमाणे करू शकत नाही. समाजात अनेक व्यक्ती एकत्र राहत असतात. प्रत्येकाने आपल्या मर्जीप्रमाणे राहायचे ठरवले तर समाजात मोठ्या प्रमाणात अराजकता निर्माण होईल. यासाठी सामाजिक जीवन जगताना व्यक्तीच्या वर्तनावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे अपरिहार्य ठरते अशा प्रकारच्या नियंत्रणाचा सामाजिक नियमाने म्हणतात समाजात वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सामाजिक नियमांचे पालन करणे किंवा अशा नियमांच्या बंधनात राहणे भाग पडते. सामाजिक जीवनात व्यक्तीला प्राप्त झालेल्या अशा संधी किंवा सवलती म्हणजे हक्क होय.मानवी हक्क म्हणजे मनुष्याला निसर्ग ताच जन्मापासून मिळाले असे हक्क आहेत, जे माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, बुद्धी व वैचारिक वृद्धीसाठी, मानवी मुल्यांच्या संवर्धनासाठी महत्वाचे असून ते माणसाच्या भावनिक, अध्यात्मिक व अन्य कर्जा पूर्ण करण्याकरता आवश्यक असतात. हॅरॉल्ड लॉस्की यांच्या मते " या परिस्थितीच्या घटका

शिवाय व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती साधता येत नाही त्या परिस्थितीच्या घटकांना मानवी हक्क असे म्हणतात''१ रँडम हॉउस विश्वकोशात 'मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार की जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहे.'२ अशी व्याख्या केलेली आहे राज्यद्वारा मान्यता प्राप्त हक्कांचा 'मूलभूत अधिकार' म्हणून राज्यघटनेत समावेश करण्याची प्रथा अठराव्या शतकाच्या अखेरीस रूढ झाली.मूलभूत अधिकार यांना व्यापक आणि सार्वत्रिक स्वरूप देण्याच्या उद्देशाने त्याचा उल्लेख मानवी अधिकार म्हणून करण्यास विसाव्या शतकात प्रारंभ झाला.

मानवी हक्क हे नैसर्गिक हक्कांचे आधुनिक आणि निरपेक्ष रूप आहे मानवी हक्कांवर इतर अधिकारांची मर्यादा नसते. ते स्थळ, कालपरत्वे बदलत नाही. सामूहिक हितासाठी देखील मानवी हक्कांचे उल्लंघन करता येत नाही. मानवी हक्क हे एका व्यक्ती किंवा समाजापुरते मर्यादित नसून ते या विश्वातील प्रत्येक व्यक्तीला माणूस या नात्याने प्राप्त झालेले आहेत. हक्क मानवाला किंवा व्यक्तीला राज्याने किंवा समाजाने बहाल केलेले नाहीत तर ते व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले आहेत. हे हक्क व्यक्तिस्वातंत्र्य,विचार भाषण स्वातंत्र्य यावर आधारित आहेत. मानवी हक्क हे व्यक्तीला इतर व्यक्तींपासून, राज्याच्या अधिकारांपासून, हिंसाचारापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी प्राप्त झालेले सरक्षण कवच आहे. मानवी हक्कांकडे स्वातंत्र्य आणि न्यायाच्या मूल्यांचा पाया म्हणून बघितले जाते. राष्ट्र वंश जात धर्म भाषा लिंग इत्यादी कोणत्याही बेत भावा शिवाय मानवी हक्क व्यक्तीला प्राप्त झालेले आहेत.

**मानवी हक्कांबाबत कार्य व विचार**

**१) राजा राममोहन रॉय-**

राजा राममोहन रॉय हे भारतीय प्रबोधनाचे आद्य प्रवर्तक होते. राजा राममोहन रॉय यांनी आपल्या विचारातून प्रबोधनाचे बीजारोपण केले. त्यांचा काळ अधोगतीचा, अज्ञानाचा आणि पारंपारिकतेचा व अंधश्रद्धेचा होता. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी नवा मार्ग दिला. देशाला जणू प्रकाशाचा मार्ग दाखविला. त्यांनी पाश्चात्य बुद्धिवादी उदारमतवादी तत्वे आणि भारतीय परंपरेतील उदात्त तत्वे यांचा समन्वय घातला. लॉक थॉमस पेन यांच्या प्रमाणेच राजा राममोहन रॉय यांचा नैसर्गिक हक्कांवर विश्वास होता. मानवी स्वांतत्र्याच्या कल्पनेवर निष्ठा होती. राजाराम मोहन रॉय यांनी व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि देशाचे स्वातंत्र्य हे दोन्ही विचार प्रभावीपणे मांडले. कोणताही देश परदास्यात राहू नये, ही त्यांची कल्पना होती. व्यक्तिस्वातंत्र्य हा कोणत्याही समाजाचा प्राण असतो, असा त्यांचा दृष्टिकोन होता. व्यक्ती केवळ शरीराने स्वतंत्र असून चालत नाही, तर ती मनानेही स्वतंत्र असावी लागते. केवळ विचार करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला उपयोगी नाही, तर त्यानुसार कृती करण्याचे ही स्वातंत्र्य हवे असते. जीविताच्या हक्काशिवाय समाज जिवंत राहू शकत नाही. जीविताचा हक्क असेल आणि कोणत्याही व्यक्तीवर हल्ला झाला तर त्याचे जीवन नष्ट होईल. त्यामुळे हे कृत्य सुसंस्कृत मानवाचे नाही. राजाने, शासनाने व्यक्तीला जीवन जगण्याचे अभयदान दिले पाहिजे. त्याशिवाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास होणार नाही. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

प्रत्येक व्यक्तीला मालमत्ता संपादन करण्याचा आणि मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे. 'व्यक्तीस जिविताचा, मुक्तसंचार करण्याचा, हक्क असावा. त्यासोबतच नैतिक हक्कांचा पुरस्कार केला. नागरी हक्कांमध्ये धार्मिक हक्क, जगण्याचा हक्क,संपत्तीचा हक्क, शिक्षणाचा हक्क, मत स्वातंत्र्याचा हक्क इत्यादी येत असल्याने राज्यकर्यांनी हे हक्क प्रस्थापित केले पाहीजे आणि ते प्रस्थापित झाले नसतील तर ते जनतेने केले पाहीजे'[३] असे रॉय यांचे मत होते.

अज्ञानामुळे व्यक्तीचा विकास पूर्णपणे खुंटतो तर शिक्षणामुळे व्यक्तीत जागृती निर्माण होते. शिक्षणातून उपजीविकेचे साधन उपलब्ध होऊ शकते. शिक्षणातून नव्या प्रेरणा नवे ज्ञान प्राप्त होऊन व्यक्ती रूढी व अंधश्रध्देमधून पूर्णपणे मुक्त होईल

असा त्यांचा युक्तीवाद होता. त्यासाठी त्यांनी १८१९ मध्ये कलकत्ता येथे शाळा व १८२२ मध्ये हिंदू कॉलेजची स्थापना करून शैक्षणिक प्रसाराचे कार्य केले. अभिव्यक्तीस्वातंत्र्यामुळे व्यक्तीला आपले विचार व्यक्त करता येतात. विचारानुसार आचरणाचे स्वतंत्र असायला हवे असे त्यांचे मत होते. राजाराम मोहन रॉय यांना असा विश्वास होता की ब्रिटीश सरकार जनतेला विचार करण्यासाठी विचारस्वातंत्र्य आणि प्रचार करण्यासाठी भाषणस्वातंत्र्य देऊ शकेल. धार्मिक क्षेत्रातील मूर्तिपूजेला, दांभिकपणा व सामाजिक क्षेत्रातील सतीची चाल बालविवाह बहुपत्नीत्व या पद्धतीला विरोध करून राजकीय क्षेत्रात समानता स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचा पुरस्कार केला. राजाराम मोहन रॉय यांनी १८१५ मध्ये आत्मीय सभा स्थापन करून या सभेच्या माध्यमातून स्त्रियांच्या अधिकारांच्या पुनर्प्राप्तीसाठी कार्य केले.

२) **महर्षी स्वामी दयानंद सरस्वती-**

महर्षी स्वामी दयानंद सरस्वती हे मानवतावादी समाजसुधारक होते. त्यांनी अनिष्ट रूढी, दृष्ट प्रथा आणि कर्मकांड यावर टीका करून माणसा-माणसातील संबंध न्यायावर आधारीत असावेत. सर्वाबद्दल प्रेमभाव, सद्भावना, स्त्री- पुरुष समानता, सर्व मानवजातीत बंधुभाव प्रस्थापित व्हावा, या दृष्टीने कार्य केले. स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रयत्न केले. त्यासाठी बालविवाह विरोध करून मुलींसाठी विवाहाचे वय कमीत कमी १६ वर्ष आणि मुलांसाठी कमीत कमी २५ वर्षे असावेत[४] असे मत होते. वेदाचे शिक्षण व अन्य सर्वच शिक्षण समाजातील सर्वांसाठी सारखेच खुले असावे. पुरुषांप्रमाणेच गुणकर्मस्वभावाचा हा लोकशाही निकष स्त्रियांनाही असावा, असे दयानंद यांचा विचार होता. स्त्री, शूद्रांच्या व अन्य पददलितांच्या हक्कांबद्दलचा त्याबद्दलचा त्यांना असलेला कळवळा त्यांच्या विचारातून दिसून येतो . त्यांनी लोकशाही तत्वांचे समर्थन करून लोकशाही विकेंद्रीकरणावर भर दिला.

**३) विवेकानंद-**

यांनी स्वातंत्र्याची अतिशय समावेशक अशी एक संकल्पना मांडली. त्यांच्या मते व्यक्ती म्हणजे केवळ तिचे शरीर नव्हे, तिची बुद्धी किंवा मनही नव्हे, तर 'तत त्वम असि' या औपनिषदिक सुक्ताप्रमाणे व्यक्ती म्हणजे आत्मा! नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः'असा आत्मा! व्यक्तीच्या ठायी वास्तव्य करून असणाऱ्या परमात्म्याचा तो अंश असतो. सगळेच मानवत एकाच परमात्म्याची रूपे असतील तर सहाजिकच ते समान आहेत, एकाच परमात्म्याची लेकरे असल्यामुळे ती परस्परांची भावंडे आहेत, हे सांगून बंधुत्वाचा विचार दिला. विवेकानंदानी सामाजिक विषमता अन्याय दूर करण्यासाठी आंतरजातीय विवाहाचा त्यांनी पुरस्कार केला. जातीबहिष्कृतांची स्थिती सुधारण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या मते प्रत्येकाला आपल्या शरीराचा, बुद्धिमत्तेचा, मालमत्तेचा स्वतःच्या इच्छेनुसार व इतरांना इजा किंवा उपद्रव होऊ न देता, उपभोग घेण्याचा नैसर्गिक हक्क असल्याचे आग्रही प्रतिपादन केले. त्याच प्रमाणे समाजातील प्रत्येक व्यक्तीला मालमत्ता, शिक्षण, ज्ञान संपादन करण्याची समान संधी उपलब्ध व्हायला पाहिजे[५] असेही त्यांचे ठाम मत होते. समानता व हक्क इत्यादींसाठी भारताने पश्चिमे देशांकडे पाहावे, पश्चिमी आदर्श उचलावीत. असे विवेकानंदांना वाटत होते.

**४) न्या.महादेव गोविंद रानडे-**

न्या.महादेव गोविंद रानडे यांच्या विचारवर ॲडम स्मिथ, बेंथम, जे. एस. मिल या विचारवंतांच्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. रानडे यांच्या विचारांचे अधिष्ठान म्हणजे व्यक्तीसवातंत्र्याचा सिध्दांत होय. न्या.रानडे यांचे व्यक्तीस्वातंत्र्याचे तत्व मानवाच्या सदसदविवेकबुध्दीच्या संकल्पनेवर आधारलेले आहे. सदसदविवेकबुध्दीचे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य होय. समाजातील इतर घटकांचे समान स्वातंत्र्य व अधिकार हे व्यक्तीस्वातंत्र्यावरील बंधन असते.[६] स्वातंत्र्य समानतेशिवाय राहू शकत नाही. इतरांना माझ्याइतकेच स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार आहे. हे व्यक्तीस्वातंत्र्याच्या

संकल्पनेत गृहीत असते. असे रानडे यांनी मानले होते. त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्य आणि राजकीय सहभाग या स्वरूपाची उदारमतवादी विचारसरणी स्वीकारून त्यांनी आपले राजकीय तत्वज्ञान भारतीयांसमोर ठेवली. अध्यात्मिक आणि दार्शनिक चिंतनातून व्यक्तीच्या जीवनाच्या या संकल्पनेतून हक्कासंबंधी ची व स्वातंत्र्याची कल्पना मांडली. ते म्हणतात 'व्यक्तीच्या अंगी अनुभवाच्या व सक्रिय किंवा निष्क्रिय सवयीच्या आधारे विकास करण्याची जी नैतिक व मानसिक क्षमता असते, तिला अवसर मिळून मनुष्याच्या सर्व शक्तीचा सर्व अंगांनी विकास होऊन त्याच्या आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग मोकळा होणे म्हणजे स्वातंत्र्य होय. मानवी व्यक्तीमत्वातील ईश्वराचा आवाज म्हणजे स्वातंत्र्य होय'[७] अशी स्वातंत्र्याची व्याख्या रानडेंनी केली. त्यांची स्वातंत्र्य कल्पना केवळ अध्यात्मिक आणि नैतिक क्षेत्रापुरती मर्यादित नाही, तर त्याला नागरी हक्कांची जोड दिली. कायदे करणे कर लावणी शिक्षा देणे अधिकारी नेमणे याबाबतचे अधिकार नागरिकांना प्राप्त व्हावेत अशी मागणी शासनाकडे त्यांनी केली. १८७७ साली राणीला त्यांनी सार्वजनिक सभेच्या वतीने भारतीयांच्या हक्कांची मागणी करणारे मानपत्र पाठविले.

स्त्रियांच्या हक्कांचाही जोरदार पुरस्कार केला. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला वकांना राज्य व समाजातच संरक्षण मिळू शकते व्यक्तीला विकासाची संधी समाजातच मिळते, राज्यसंस्था विवेक अधिष्ठित कायद्यान्वये अक्कांच्या उपभोग सुलभ करते या गोष्टीची जाणीव त्यांना होती.समाज व राज्याच्या संदर्भात स्वातंत्र्याची व्याख्या करताना ते म्हणतात 'समाजाच्या संदर्भात स्वातंत्र्य म्हणजे सद्सद्विवेकाच्या आज्ञाप्रमाणे व्यक्तीजीवन शक्य कसणारी सामाजिक परिस्थिती होय.' 'राज्याच्या संदर्भात स्वातंत्र्य म्हणजे सदसदविवेकाच्या आज्ञांप्रमाणे व्यक्तीजीवन शक्य करणारी राजकीय व वैज्ञानिक परिस्थिती होय.'

### ५) दादाभाई नौरोजी-

दादाभाई नवरोजी यांनी संसदेचे प्रतिनिधी असतांना शासनाकडे प्रतिनिधी क शासनाची मागणी,कर भरणाऱ्यांना मतदानाचा अधिकार अशा मौलिक अधिकारांची मागणी करून आयुष्यभर त्याचा पाठपुरावा केला. 'एकीकडे ब्रिटिश राज्यकर्ते प्रतिनिधीक शासनाची व सनदशिर शासनाची घोषणा करतात आणि दुसरीकडे हे अंतर काढून घेतात.'[८] अशी ब्रिटिश शासनावर टीका केली.सर आज सनदशिर चळवळीच्या माध्यमातून भारतीयांना स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे कार्य केले. त्यासोबतच ब्रिटिश शासनाने भारतीयांना त्यांचे हक्क प्रदान करणे किती गरजेचे आहे, हे पटवून दिले. भाषणस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. आर्थिक उत्सारणाच्या सिद्धांत मधून जोपर्यंत भारतातून पैसा बाहेर जाणे थांबणार नाही, तोपर्यंत भारतीयांना आपल्या देशात नैसर्गिक अधिकार परत मिळणार नाही, असे स्पष्ट शब्दात म्हटले आहे. ब्रिटिशांचे धोरण हे आर्थिक शोषणाच्या बरोबरच नैतिक शोषणाची आहे अशी टीका केली. भारतीय जनतेचे शोषण व्हायला नको, भारतीयांवर लादलेले जाचक कर ताबडतोब कमी केले पाहिजेत,अशा प्रकारच्या सूचना ब्रिटिश शासनाला केल्या. कामगाराच्या श्रमाला मालमत्ता मानली पाहिजे. १४ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधीत एम्स्टरडम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी संमेलनात कामगार व श्रमीक आणि मालक यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी इंडस्ट्रीयल कमिशनर कोर्ट स्थापन करावे अशी सुचना केली. श्रमीकांचे शोषण होऊ नये या उद्देशाने त्यांनी श्रमीकांचे अधिकार हा ग्रंथ लिहिला. भारतीय जनतेला व शासनाचे अधिकार मिळाले पाहिजे, असा आग्रह ब्रिटिश संसदेत धरला.

### ६) ना.गोपाळ कृष्ण गोखले-

ना.गोपाळ कृष्ण गोखले हे उदारमतवादी विचारवंत होते. जे.एस. मिल, हर्बट स्पेन्सर या विचारवंतांकडून त्यांनी प्रेरणा घेतली. व्यक्तीस्वातंत्र्य, प्रतिनिधीकता, लोकशाही, सनदशीरपणा या उदारमतवादी विचारांवर त्यांचा दृढविस्वास होता.

ना.गोखलेंच्या मते,शासन मानवाकरीता असून मानवी इच्छेतुन गरजेप्रमाणे ते बदलण्याचा अधिकार असावा. शासनाच्या मर्यादा व्यक्तीच्या इच्छेनुसार ठराव्यात.

आर्थिक विचारामध्ये कल्याणकारी राज्यसंस्थेचा पुरस्कार करून नागरीकांच्या शोषणाविरूध्द गोखलेंनी आवाज उठविला. सामाजिक प्रश्नावर सामुहीक हितसंबंधाचा पाढपुरावा केला. सामाजिक क्षेत्रात जातीभेद नसावा,पुनर्विवाह व्हावेत,अस्पृश्यता नाहीशी करावी असे त्यांनी स्पस्ट केले. पाश्च्यात्य शिक्षणाच्या संस्कारातुन जो भारतीय राजकारणात सुशिक्षीत मध्यमवर्गीय समाज निर्माण झाला. त्या समाजाने राष्ट्र उभारणीच्या कार्यात महत्वाची जबाबदारी पार पाडली पाहीजे असे ना. गोखलेंचे मत होते.

पाश्च्यात्य राष्ट्रांमध्ये सार्वजनिक जीवन असल्याने व्यक्तीस्वातंत्र्याची व राजकीय हक्कांची प्राप्ती व उपभोग जीथे घेता येतो, त्याचबरोबर तेथिल नागरीकांना आपल्या कर्तव्याची,जबाबदारीची भावना यामधुन निर्माण झाली.असे गोखलेंचे मत होते. हिंदुस्थानातील नागरीकांनी देखील सार्वजनिक जीवन निर्माण करावे तरच व्यक्तीस्वातंत्र्य व राजकीय हक्कांची प्राप्ती होईल.[९] असे स्पस्ट करतात. राज्यसंस्थेबरोबर नागरी समाजाची उभारणी स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता, न्याय या पायावर आधारित समाज गोखलेंना अपेक्षित होता.

**७) मानवेंद्रनाथ रॉय**-

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नवमानवतावादाला मुलगामी मानवतावाद ,वैज्ञानिक मानवतावाद असे संबोधले जाते. त्यामध्ये त्यांनी मानव हाच प्रत्येक गोष्टीचा मानदंड आहे. व्यक्तीस्वातंत्र्य हे मानवतावादाचे मुख्य तत्व असते. असे सांगून स्वातंत्र्य, बुध्दीप्रामाण्य, धर्मनिरपेक्ष, नैतिकता या तीन सांस्कृतीक मुल्यांचा पुरस्कार केला. रॉय यांच्या मते स्वातंत्र्य हे नवमानवतावादी तत्वज्ञानाचे आद्य मूल्य आहे. मानवाला स्वतंत्र होण्यासाठी केवळ आर्थिक गरजांची पूर्तता होऊन भागणार नाही, तर त्याच्या बौद्धिक व मानसिक विकासाला अनुकूल असे सामाजिक, राजकीय वातावरण व परिस्थिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांनी व्यक्तीस्वातंत्र्याला लोकशाहीत विषेश महत्व दिले. राज्य धर्म समाज अशा सर्व बंधनातून व्यक्तीची मुक्तता झाली पाहीजे.व्यक्तीला आपल्या विवेकबुध्दीच्या आधारे व्यक्तीस्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा अशी समाजव्यवस्था असली पाहीजे. त्यांनी व्यक्तीविकास व व्यक्तीस्वातंत्र्य या गोष्टींना नवमानवतावादात श्रेष्ठ स्थान दिले. स्वातंत्र्य समता,बंधुत्व या लोकशाही मुल्यांच्या आधारे सांस्कृतीक परिवर्तन आणि त्यातून सामाजिक परिवर्तन घडवून आणता येईल,[१०] अशी त्यांची धारणा होती.

**८) महात्मा फुले**:-

महात्मा फुले यांच्या लेखनावर थॉमस पेनच्या लेखनाचा प्रभाव दिसून येतो. पेन प्रमाणेच जॉर्ज वाशिंग्टन, बेंजामिन, फ्रँकलीन, यासारख्या लोकशाही पुरस्कृत विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव महात्मा फुलेंवर पडला होता. अमेरिकेतील निग्रो लोकांच्या मुक्तीसग्रामाबाबत त्यांना आकर्षण होते. त्यांनी शूद्रातिशूद्रांच्या दृष्टिकोनातून मानवी हक्कांची मांडणी केलेली आहे.[११] समाजातील उच्चवर्णीयांनी शूद्रातिशूद्रांना ज्या सामाजिक व मानसिक गुलामगिरी ठेवले. हे लक्षात आल्यानंतर त्यांनी जातिव्यवस्थेचे उच्चाटन व स्त्री- शूद्रातिशूद्रांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले.

१८४८ सालीज्योतिबा फुलेंनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. मुलींना शाळेत शिकवण्यासाठी त्यांनी स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिकविले. ज्योतिबा फुलेंनी स्त्रियांच्या शिक्षणाबरोबरच सामाजिक रूढी-परंपरामधून स्त्रियांना मुक्ती मिळावी यासाठी प्रयत्न केले. विधवांचे केशवपन, विधवा पुनर्विवाहास बंदी, स्त्रियांचे हित, दर्जा आणि अज्ञान दूर

करण्यासाठी कार्य केले. त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण यांच्या विरोधात फुले यांनी आवाज उठवला. दलित, शोषित, पूर्वास्पृश्य, गरीब, स्त्रिया यांच्या उद्धारासाठी फुलेंनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

महात्मा फुले यांच्या मते, "माणसाचे माणूस म्हणून असलेले हक्क त्याला कधीच कोणी नाकारू शकत नाही. सर्व प्राणिमात्र परमेश्वराची समान लेकरे असल्यामुळे सर्वांना समान अधिकार आहेत. पृथ्वीवरील सर्व गोष्टींचा उपभोग घेण्याचा सर्वांना समान अधिकार आहे.स्त्री-पुरुष दोघांनाही ही एकाच निर्मिकाने निर्माण केलेले असल्याने त्यांना सारखे अधिकार प्राप्त होतात.'[१२] अशी फुलेंची भूमिका होती.

जातिभेद, अस्पृश्यता स्त्रीदास्य यांचा त्यांनी कडाडून विरोध केला. बालविवाह, बहुपत्नीत्व, बालजरठ विवाह, पुरुष वासनेला बळी पडण्याचा धोका, स्त्री भ्रूणहत्या अशा प्रश्नांच्या विरोधी फुले यांनी आवाज उठवला. महात्मा फुले यांचा विरोध ब्राह्मणांना नव्हता तर तो ब्राह्मणशाहीला होता व तोही तत्कालीन विशिष्ट परिस्थितीची तीव्र प्रतिक्रिया म्हणून होता. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत फूट पडावी असे त्यांचे उद्दिष्ट नव्हते. 'मानवी समानता' हे ज्योतिबा फुले यांच्या उदारमतवादी विचारांचा गाभा होता.

**९) डॉ.बाबासाहेब आंबेडकर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील दलित शोषित पिडीत अस्पृश्य समाजाच्या मानवी अधिकाराचे उद्गाते होते. पिढ्यानपिढ्या सर्वांगीण मानवी अधिकारापासून वंचित असलेल्या अस्पृश्य समाजाला त्यांचे मानवी अधिकार प्रदान करण्याकरिता त्याना आयुष्यभर संघर्ष करावा लागला. मानवाला मानवी अधिकारापासून वंचित ठेवल्या जात होते. याविरुद्ध आवाज उठविण्याचे कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. महाड पासून त्यांनी या संघर्षाची सुरुवात केली. २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी कुलाबा जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर सत्याग्रह केला. हिंदूधर्माने अस्पृश्य समाजाला सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा मूलभूत मानवी अधिकार नाकारला होता. बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी प्राशन करून अस्पृश्य बांधवांना आपला मूलभूत मानवी हक्क मिळवून दिला. हिंदूंच्या मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी नाशिक येथे काळाराम मंदिर येथे सत्याग्रह केला. तसेच पुण्यातील पर्वती मंदिर, मुखेड पुणे व विदर्भातील अमरावती या ठिकाणी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा सर्व माणसे जन्मता समान आहेत. त्यांना समान मानवी हक्क मिळण्याचा आग्रह केला. याप्रसंगी दलित अस्पृश्यांना मानवी हक्क नाकारणाऱ्या 'मनुस्मृती' या धर्मग्रंथाचे दहन करण्यात आले. अशाप्रकारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजाला सामाजिक अधिकार प्रदान करण्यासाठी संघर्ष केला.

१९२६ ते १९३६ याकाळात मुंबई विधीमंडळाचे सदस्य म्हणून अस्पृश्यांच्या विकासासाठी भारताच्या भावी घटनेत अस्पृश्यांना अधिकार, कायद्यापुढे सर्वांना समान लेखले पाहिजे, अस्पृश्यता पडणाऱ्या व सामाजिक बहिष्कार करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे, लोकसंख्येच्या प्रमाणात अस्पृश्यांना प्रतिनिधीत्व मिळावे. या मागण्या विधिमंडळात मांडून त्या मिळवण्यासाठी अविरत परिश्रम घेतले. १९३० मध्ये लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहून अस्पृश्यांचे प्रश्न, समस्यांची प्रभावीपणे मांडणी केली. मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत इत्यादी दलित पिढी शोषित वर्गाचे म्हणजेच मानवी हक्क नाकारलेल्या वर्गाचे मुखपत्र असलेले वृत्तपत्र प्रकाशित करून त्यांनी मानवी हक्क नाकारणाऱ्या वर्गावर टीकास्त्र सोडले.

इ.स. १९२९ मध्ये त्यांनी अस्पृश्य कामगार वर्गांना संपापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. गिरणी कामगारांची सभा घेवून त्यांना त्यांच्या अधिकार व कर्तव्याची जाणीव करून दिली. इ.स. १९३६ मध्ये बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना

केली. या पक्षाच्या जाहीरनाम्यात त्यांनी भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी आणि कामगार वर्गाच्या हक्काची मागणी केली. इ.स. १९३७ मध्ये बाबासाहेबांनी खोती विषयीचे विधेयक विधीमंडळात मांडले. इ.स. १९३८ मध्ये त्यांनी रेल्वे कामगार वर्गाला आपले हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करण्यास सांगितले. इ.स. १९३८ मध्येच बाबासाहेबांनी आपल्या मागण्या व हक्कासाठी गिरणी कामगारांचा एक दिवसाचा संप घडवून आणला. इ.स. १९४२ मध्ये बाबासाहेबांची मजूरमंत्री म्हणून निवड करण्यात आली.[१३] मजूरमंत्री पदावर असताना त्यांनी मजूरांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष यांच्या माध्यमातून अस्पृश्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिण्यासाठी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून महत्त्वपूर्ण कार्य करून संविधानाच्या तिसऱ्या भागात १४ ते ३२ कलमे व मार्गदर्शक तत्वांमधुन मुलभुत मानवी हक्कांची प्रस्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर पूर्णपणे विश्वास होता. सामाजिक व राजकीय रचने संबंधी त्यांनी व्यक्ती, व्यक्तीचे हक्क ही मध्यवर्ती संकल्पना मांडली. व्यक्ती विकासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असणाऱ्या उदेय नैसर्गिक कांचे शासनाने संरक्षण केले पाहिजे[१४] असे त्यांचे मत होते.

हक्क हे व्यक्तीच्या कल्याणासाठी आवश्यक असतात त्यासाठी त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात समता, स्वातंत्र्य, शोषणाविरुद्धचा हक्क,धर्मस्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, घटनात्मक उपाययोजनेचा हक्क या मूलभूत मानवी हक्कांची तरतूद घटनेत केली. त्यासोबतच भारतीय राज्यघटनेच्या नागरिकांना सामाजिक आर्थिक व राजकीय न्यायाची तसेच स्वातंत्र्य समता बंधुता यांची हमी दिली.

**समारोपः-**

इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांनी आपल्या प्रशासनासाठी भारतीयांना इंग्रजी भाषेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतात सुशिक्षित भारतीयांची पहिली पिढी निर्माण केली. या सुशिक्षित भारतियांनी भारतात सामाजिक, धार्मिक आणि राजकीय सुधारणा चळवळी सुरू केल्या. यातून भारतीय समाजव्यवस्थेतील सतीप्रथा, केशवपन, विधवा विवाहबंदी, अस्पृश्यता, जातीभेद, विषमता यासारख्या अनिष्ट चालीरिती दूर होऊ लागल्या. राजाराम मोहन रॉय यांनी व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि देशाचे स्वातंत्र्य या दोन्ही हक्कांची प्रभावीपणे मांडणी करून ब्रिटीश शासनाकडे मागणी केली. पुरुषांप्रमाणेच गुणकर्मस्वभावाचा हा लोकशाही निकष स्त्रियांनाही असावा, असे महर्षी दयानंद सरस्वती यांचा विचार होता. व्यक्तीस्वातंत्र्याचे तत्व मानवाच्या सदसदविवेकबुध्दीच्या संकल्पनेवर आधारलेले आहे. सदसदविवेकबुध्दीचे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य होय. न्या.रानडे यांचे मत होते. आर्थिक उत्सारणाच्या सिद्धांत मधून जोपर्यंत भारतातून पैसा बाहेर जाणे थांबणार नाही, तोपर्यंत भारतीयांना आपल्या देशात नैसर्गिक अधिकार परत मिळणार नाही, असे स्पष्ट शब्दात दादाभाई नौरोजींनी म्हटले आहे. व्यक्तीस्वातंत्र्य, प्रतिनिधीकता, लोकशाही, सनदशीरपणा या उदारमतवादी विचारांवर ना.गोपाळ कृष्ण गोखलेंचा दृढविस्वास होता. स्वातंत्र्य, बुध्दीप्रामाण्य, धर्मनिरपेक्ष, नैतिकता या तीन सांस्कृतीक मुल्यांचा पुरस्कार मानवेंद्रनाथ यांनी रॉय केला. महात्मा फुलेंनी दलित, शोषित, पूर्वास्पृश्य, गरीब, स्त्रिया यांच्या उद्धारासाठी फुलेंनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. पिढ्यानपिढ्या सर्वांगीण मानवी अधिकारापासून वंचित असलेल्या अस्पृश्य समाजाला त्यांचे मानवी अधिकार प्रदान करण्याकरिता त्याना आयुष्यभर संघर्ष करून संविधानात मुलभूत मानवी हक्कांची तरतुद केली.

**संदर्भसुचीः-**

१) मिसाळ चंद्रकांत मानवी हक्क व जबाबदा-या, व्हिजन अँकॅडमी पुणे, २०११ पृ.५

२) देवळाणकर शैलेंद्र समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद,२०११ पृ १८८

३) पाटील संभाजी संतोष, शोधनिबंध-थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचा अभ्यास, Pune Research Scholar an international Multidisciplinary Journal Vol.5, Issue.2 2019 page 3

४) डॉ. साबळे आर. डी,भारतीय राजकीय विचार,हिमालया पब्लिशिंग हॉउस ,मुंबई,२०१३ पृ.७४

५) भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपुर,२००२ पृ. १०४,१०५.

६) व्होरा राजेंद्र, न्या. रानडे यांचा उदारमतवादी विचार,परामर्श प्रकाशन पुणे, खंड ४ अंक ३, नोव्हेंबर १९८२ पृ ३८.

७) भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपुर,२००२ पृ. १५०,१५१

८) देवरे पी. डी.,निकुंभ डी.एस. भारतीय राजकीय विचार, प्रशांत पब्लिकेशन जळगांव,२००८ पृ.१७

९) नांदवडेकर व्ही. डी. आधुनिक भारतीय राजकीय विचार,ुदुरशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,२०१९ पृ.१०.

१०) पाटील बी.बी.,भारतीय राजकीय विचारवंत फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९७ पृ.१०९

११) नांदवडेकर व्ही. डी. आधुनिक भारतीय राजकीय विचार,ुदुरशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,२०१९ पृ.११

१२) कित्ता पृ.१२)

१३) https://suryakantkapshikar.blogspot.com/2021/02/blog-post_25.html

१४) पाटील वा.भा.आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव,२००९ पृ.२०९